# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/2834/2023-24 दि.16/02/2024

विषय :- शासकीय जमा लेखांकण यंत्रणा यांना सहाय्य करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी नेमणूक आदेश.

संदर्भ :- 1. क्र.मुद्रांक-2024/प्र.क्र.46/म-1(धोरण), दि.07/02/2024.
2. जा.क्र.मनपा/आस्था/2830/2023-24, दि.15/02/2024 रोजीचा आदेश.
3. जा.क्र.का-9/आस्था-4/नियुक्ती/335/2024, दि.12/02/2024 रोजीचा आदेश.

**आदेश**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयाशी तसेच महसुल व वन विभाग कार्यालयाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांशी संबंधित असलेल्या कार्य कंत्राट, विकसन करार, टी.डी.आर. हस्तांतरण करार, भाडेपट्टा इत्यादी संलेखावर यथोचित मुद्रांक शुल्क शासकीय जमा लेखांकण यंत्रणा Government Receipt Accounting System (GRAS) मार्फत राज्य शासनाकडे भरलेले आहे किंवा कसे याची सुनिश्चिती व तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी पथकामार्फत तपासणी करणेचे अनुषंगाने संदर्भ क्र.01 अन्वये कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडून सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर विशेष तपासणी पथकास मिरा भाईंदर महानगरपालिकेने तसेच त्यांचे अधिनस्त कार्यालयांनी सर्व नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते अभिरक्षेत असणारी कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्यास तसेच सदर पथकास सहाय्य करण्यासाठी मिरा महानगरपालिका आस्थापनेवरील श्री.अविनाश जाधव, लेखापरिक्षा अधिकारी भ्रमणध्वनी क्र.8422811363 यांची संदर्भ क्र.02 अन्वये नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

पथकाच्या कामकाजाकरीता खालीलप्रमाणे अतिरिक्त अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | विभागाचे नाव | पथकाच्या कामकाजाकरीता नेमणूक करण्यात आलेले पद |
|---|---|---|---|
| 1. | श्री.भरत कुंडले, सहा.नगररचनाकार | नगररचना विभाग | सहाय्यक नोडल अधिकारी |
| 2. | श्री.कांतीलाल संखे, सेवा निवृत्त लेखापरिक्षण अधिकारी | लेखापरिक्षण विभाग | सहाय्यक नोडल अधिकारी |
| 3. | श्रीम.प्राजक्ता पाटील, लिपीक | नगररचना विभाग | लिपीक |
| 4. | श्री.समीर लचका, शिपाई | माझी वसुंधरा | शिपाई |
| 5. | श्री.सागर घागस, शिपाई | नगरसचिव विभाग | शिपाई |
| 6. | श्रीम.श्रध्दा सिंग, ठेका संगणक चालक तथा लिपीक | आस्थापना विभाग | संगणक चालक |

वरील कर्मचारी यांनी श्री.अविनाश जाधव, नोडल अधिकारी यांचेशी समन्वय साधून कामकाजास सुरूवात करावी.

(अनिकेत मानोरकर)
अतिरिक्त आयुक्त (1)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
1. संबंधित कर्मचारी
2. संबंधित विभाग
3. नगररचना विभाग
/- संदर्भ क्र.3 च्या आदेशामध्ये नमुद अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता राहण्याची व्यवस्था करण्यात यावी.

प्रत माहितीस्तव :-
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय (विस्तार)

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय, पुणे.
नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे-411 001.
फोन-020-26123826 e-mail-do9.igro@igrmaharashtra.gov.in; desk9est@gmail.com

जा.क्र.का-9/आस्था-4/ नियुक्ती/135 /2024

दिनांक- 12 /02/2024

संदर्भ:- 1) शासन पत्र क्र.मुद्रांक 2024/प्र.क्र.46/म-1(धोरण) दिनांक 07/02/2024
2) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र. नोउमनिऔ/ तपासणी/ मिरा भाईंदर/142/2024 दिनांक 09/02/2024.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम 10 ड (1) च्या तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून दि. 03 जून 2016 रोजी अधिसूचनेद्वारे राज्य शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संघटना, बँक व्यवसायी, बँकेतर वित्तीय संस्था इ. याच्या यंत्रणेमार्फत संमत होणाऱ्या किंवा त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या कार्यकंत्राट, विकसन करार, टी.डी.आर. हस्तांतरण करार, भाडेपट्टा इ. संलेखावर यथोचित मुद्रांक शुल्क शासकीय जमा लेखांकन यंत्रणा Government Receipt Accounting System मार्फत राज्य शासनाकडे भरले जाते त्याची सुनिश्चिती करतील, असे निर्देश दिलेले आहेत

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.1 च्या शासन पत्रान्वये मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयाशी तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांशी संबंधित असलेल्या कार्यकंत्राट, विकसन करार, टी.डी.आर. हस्तांतरण करार, भाडेपट्टा इ. संलेखावर यथोचित मुद्रांक शुल्क शासकीय जमा लेखांकन यंत्रणा Government Receipt Accounting System (GRAS) मार्फत राज्य शासनाकडे भरलेले आहे किंवा कसे याची सुनिश्चिती व तपासणी करण्यासाठी या कार्यालयातील दस्तांची प्रायोगिक तत्वावर विशेष तपासणी पथकामार्फत तपासणी करणेचे निर्देश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, शासन पत्रान्वये निर्देशित केल्यानूसार सदर विशेष तपासणी पथकास मीरा भाईंदर महानगरपालिकेने तसेच त्यांचे अधिनस्त कार्यालयांनी सर्व नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्ताऐवज किंवा कार्यवृत्ते अभिरक्षेत असणारी कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्याची तसेच सदर पथकास सहाय करण्यासाठी नोडल अधिकारी नेमण्याची कार्यवाही महानगरपालिकेने करावी.तसेच विशेष तपासणी पथकाने प्रत्येक सोमवारी त्यांच्या एका आठवड्यात केलेल्या तपासणीचा अहवाल या कार्यालयातील संबंधित कार्यासनास सादर करावा.

तसेच विशेष तपासणी पथकास मुद्रांक व नोंदणी अधिनियमातील तज्ज्ञ तथा जाणकार अधिकारी वा कर्मचारी यांचे सहाय्य घेण्याची मुभा राहील. तसेच संबंधित अधिका-यांनी तपासणी पथकास वेळोवेळी सहाय्य करणे त्यांचेवर बंधनकारक राहील. विशेष तपासणी पथकाने दस्तऐवजांची तपासणी मुद्रांक कायद्यातील तरतुदींनुसार काटेकोरपणे व निष्पक्षपातीपणे करणे आवश्यक आहे. तपासणी पथकाने केलेल्या तपासणीत अनियमितता वा अन्य गैरमार्गाचा अवलंब केल्याचे शासनास चौकशीअंती आढळून आल्यास त्यांचेविरूद्ध शिस्तभंगाची कडक कार्यवाही करण्यात येईल.

त्याअर्थी, खालील तक्त्तातील नमुद अधिकारी कर्मचारी यांची तपासणी पथकात नियुक्ती करण्यात येत असून त्यांच्या सेवा तपासणी पथकात तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणेत येत आहे. तसेच सदर तपासणी कामकाजासाठी आवश्यक अभिलेख, संगणक सामगी, प्रिंटर, टोनर, पेपर, विश्रामगृहात राहण्याची व्यवस्था करण्यासह आवश्यकतेनुसार वर्ग-४ चा कर्मचारी वर्ग संबंधित महानगरपालिकेने उपलब्ध करुन दयावेत. मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयातील तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांतील कार्यकंत्राट, विकसन करार, टी.डी.आर. हस्तांतरण करार, भाडेपटटा इ. संलेख तथा दस्तांची तपासणी करण्यासाठी नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे विशेष तपासणी पथक गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी कर्मचारी नाव | पदनाम | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | श्री.व्ही.एस.भालेराव | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर. |
| 2. | श्री.बी.एन.गरुड | सह जिल्हा निबंधक वर्ग-1 | सह जिल्हा निबंधक वर्ग-1 मुंबई उपनगर |
| 3. | श्री.परिमल वर्दम | सह दुय्यम निबधक वर्ग-2, | सह दुय्यम निबधक वर्ग-2, अंधेरी क्र.7 |
| 4. | श्री.एस.ए.चाकरे | सह जिल्हा निबंधक वर्ग-2 तथा प्रशासकीय अधिकारी | सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे शहर. |
| 5. | श्री.पी.जी.खडके | दुय्यम निबंधक श्रेणी-1 | दुय्यम निबंधक श्रेणी-1 खालापूर सध्या अभिलेख कक्ष (मुंबई उपनगर) |
| 6. | श्री.यु.एम. बैसाणे | दुय्यम निबंधक श्रेणी-1 | दुय्यम निबंधक श्रेणी-1 कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर |
| 7. | श्री डी.ए. केकाण | वरिष्ठ लिपिक | सह दुय्यम निबधक वर्ग-2, बोरीवली क्र.3 |
| 8. | श्रीमती राजश्री राजगुरु | वरिष्ठ लिपिक | सह दुय्यम निबधक वर्ग-2, अंधेरी क्र.4 |

... यांना संबधित कार्यालयांनी त्वरीत कार्यमुक्त करावे व सदर अधिकारी कर्मचारी यांनी त्वरीत तपासणी पथकात हजर व्हावे.

हिरालाल सोनवणे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

1) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक ठाणे विभाग ठाणे
2) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रत-1) महानगरपालिका आयुक्त , मीरा भाईंदर महानगरपालिका, मीरा भाईंदर जिल्हा ठाणे.
2) नोंदणी उपमहानिरीक्षक मुंबई विभाग मुंबई
3) सर्व संबधित सह जिल्हा निबंधक वर्ग-1
4) सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी.
5) कक्ष अधिकारी म-1(धोरण) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव
6) सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.10,11 व 12 यांना कार्यवाहीसाठी.